e Paper

आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 05/03/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 75 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# सीमा सावळे,राजेंद्र जगताप,फझल शेख यांना नगरसेवक पदाची संधी

## राष्ट्रवादीकडून तीन स्वीकृत नगरसेवकांची घोषणा; अनुभवी नेतृत्वाला संधी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकामध्ये स्वीकृत नगरसेवक पदासाठी तीन अनुभवी नेत्यांना संधी देण्यात आली आहे. यामध्ये माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, माजी शिक्षण मंडळ सभापती फझल शेख आणि माजी स्थायी समिती सभापती सीमा सावळे यांचा समावेश आहे. आज या तिघांनी स्वीकृत नगरसेवक पदासाठी अधिकृत अर्ज दाखल केले.**







महापालिकेत राष्ट्रवादीचे 37 नगरसेवक निवडून आल्यामुळे कायद्यानुसार पक्षाला तीन स्वीकृत नगरसेवक नियुक्त करण्याचा अधिकार मिळाला आहे. त्यानुसार संघटनात्मक बांधिलकी, प्रशासकीय अनुभव आणि सामाजिक कार्यातील सातत्य यांचा विचार करून या तिघांची निवड करण्यात आल्याचे पक्षाकडून सांगण्यात आले.

महानगरपालिकेच्या कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव, विविध समित्यांमध्ये प्रभावी कामगिरी तसेच शहर विकासाबाबत स्पष्ट भूमिका या निकषांवर उमेदवारांची निवड करण्यात आली. राजेंद्र जगताप यांनी नगरसेवक म्हणून विकासकामांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला आहे. सीमा सावळे यांनी स्थायी समिती सभापती म्हणून आर्थिक नियोजन आणि विकासकामांवर प्रभावी नियंत्रण ठेवले होते. तर फझल शेख यांनी शिक्षण मंडळाच्या माध्यमातून शैक्षणिक सुविधांच्या उन्नतीसाठी काम केले आहे.

या तिघांच्या माध्यमातून महापालिकेत धोरणात्मक निर्णय प्रक्रियेला बळ मिळेल, तसेच शहरातील प्रलंबित प्रश्नांवर प्रभावी आवाज उठवता येईल, असा विश्वास राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण विषयक मुद्द्यांवर हे सदस्य सक्रिय भूमिका बजावतील, असेही स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, भारतीय जनता पक्षाच्या वतीने सात जणांना स्वीकृत नगरसेवक पदासाठी संधी देण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

त्यामुळे महापालिकेतील राजकीय समीकरणे अधिक स्पष्ट होत असून, आगामी काळात सभागृहात दोन्ही पक्षांमध्ये भूमिका अधिक ठळकपणे मांडल्या जाण्याची शक्यता आहे.

यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांच्या उपस्थितीत महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडे स्वीकृत नगरसेवक पदाचे अर्ज अधिकृतरीत्या सादर करण्यात आले.

# महानगरपालिकेचे सर्वसाधारण सभेचे कामकाज लाईव्ह करा ; भाऊसाहेब भोईर यांची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सर्वसाधारण सभेचे कामकाज लाईव्ह करण्यात यावे, अशी मागणी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी मनपायुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पारदर्शक लोकशाही व्यवस्थेसाठी सर्वसाधारण सभेचे कामकाज नागरिकांसमोर खुले असणे अत्यंत आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड ही राज्यातील एक महत्त्वाची आणि 'स्मार्ट सिटी' म्हणून नावलौकिक मिळवलेली महानगरपालिका आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासंबंधीचे महत्त्वपूर्ण निर्णय, विविध ठराव, विकासकामांवरील चर्चा तसेच करदात्यांच्या पैशांचे नियोजन या सर्व बाबी सर्वसाधारण सभेत ठरवल्या जातात. त्यामुळे या कामकाजाचे थेट प्रक्षेपण होणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

भाऊसाहेब भोईर म्हणाले की, सध्याच्या डिजिटल युगात नागरिकांना आपल्या प्रभागातील लोकप्रतिनिधी सभागृहात कोणते प्रश्न मांडतात, तसेच प्रशासकीय निर्णयप्रक्रिया कशी पार पडते, हे जाणून घेण्याची उत्सुकता असते. प्रशासनात पारदर्शकता वाढावी आणि लोकशाहीवरील नागरिकांचा विश्वास दृढ व्हावा यासाठी सर्वसाधारण सभेचे कामकाज मनपाच्या अधिकृत यूट्यूब चॅनल किंवा फेसबुक पेजवरून थेट प्रक्षेपित करणे ही काळाची गरज आहे.

तसेच मुंबई महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका यांसारख्या महानगरपालिकांमध्ये सभेचे कामकाज लाईव्ह करण्याची सुविधा उपलब्ध आहे. पिंपरी चिंचवड 'स्मार्ट सिटी' उपक्रमांतर्गत तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करत असल्याने हे पाऊल उचलणे प्रशासनासाठी सहज शक्य आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जनहित आणि पारदर्शकता लक्षात घेता आगामी सर्वसाधारण सभेपासूनच हे कामकाज लाईव्ह करण्याबाबत संबंधित विभागाला तातडीने आदेश द्यावेत, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

# "निगडी ते आकुर्डी रस्ता डांबरीकरण करा, अन्यथा..."; मनसे आक्रमक!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**निगडी ते आकुर्डी मार्गावरील खड्ड्यांमुळे वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर मनसे आक्रमक झाली आहे. सचिन चिखले (मनसे अध्यक्ष, पिंपरी चिंचवड) यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देत तातडीने डांबरीकरण करण्याची मागणी केली असून, अन्यथा 25 मार्च रोजी निगडी सिग्नल येथे चक्का जाम आंदोलनाचा इशारा दिला आहे.**




निगडी सिग्नल ते चिंचवड स्टेशन या मुख्य मार्गावर महा मेट्रोचे काम गेल्या एक ते दीड वर्षांपासून सुरू आहे. या कालावधीत रस्त्याची दुरवस्था झाली असून मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या मार्गावरून दररोज हजारो प्रवासी तसेच लहान-मोठी वाहने मोठ्या संख्येने ये-जा करतात. परिणामी, खड्ड्यांमुळे अनेक अपघात घडले असून अजूनही अपघातांची मालिका सुरूच असल्याचा आरोप मनसेकडून करण्यात आला आहे.

निगडी सिग्नल ते आकुर्डी दरम्यानची परिस्थिती अधिकच गंभीर असून, रस्त्यावर धुळीचे ढग, खोल खड्डे आणि विस्कळीत वाहतूक यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. महा मेट्रोकडे पुरेसे बजेट असूनही कामाकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर वाढत असल्याचे चिखले यांनी म्हटले आहे.

याचप्रमाणे श्रीकृष्ण मंदिर परिसरातील रस्ता गेल्या वर्षभरापासून खोदून ठेवण्यात आला असून तेथे कोणतीही ठोस कामे झालेली नाहीत. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि व्यावसायिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

"लवकरात लवकर संबंधित रस्त्यांचे डांबरीकरण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा मनसेच्या वतीने 25 मार्च रोजी निगडी सिग्नल येथे चक्का जाम आंदोलन करण्यात येईल," असा स्पष्ट इशारा सचिन चिखले यांनी दिला आहे.

आता प्रशासन याकडे कितपत गांभीर्याने पाहते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

3

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 05/03/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मुळा-मुठा नदी प्रदूषणाविरोधात 'एमआयटी'च्या विद्यार्थ्यांचा एल्गार

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे शहराची जीवनवाहिनी असणाऱ्या मुळा-मुठा नदीपात्रात कुठलीही प्रक्रिया न करता अवैधरित्या टाकण्यात येणारा कचरा त्वरित बंद करावा, या मागणीसाठी एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एडीटी) शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी बुधवारी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर तीव्र निदर्शने केली.**




या आंदोलनात शैक्षणिक संकुलातील एमआयटी विश्वशांती गुरुकुल, एमआयटी ज्युनिअर महाविद्यालय व एमआयटी एडीटी विद्यापीठातील हजारो विद्यार्थी व निवासी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. यावेळी सर्वांनी या विषयाची गंभीरता, भविष्यातील संभाव्य धोके, मुळा-मुठा नदीचे अस्तित्व, परिसरातील पर्यावरणाबाबत स्थानिक ग्रामपंचायतींची उदासीनता तसेच स्थानिक व जिल्हा प्रशासनाकडून या अत्यंत गंभीर प्रश्नाकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष यांच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी केली. तसेच विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनाला नदीत कुठलीही प्रक्रिया न करता दररोज टाकला जाणारा 35 ते 40 ट्रॅक्टर कचरा तातडीने थांबविण्याची तसेच विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावरच सदर वाहने आडविण्याची विनंती केली. यावेळी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ प्रशासनासह स्थानिक पोलिसांनाही याबाबत पत्र दिले.

नुकतीच नदीपात्रात टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यांच्या ढिगाऱ्यांना 26 फेब्रुवारी 2026 रोजी भयंकर आग लागली, जी पुढील तब्बल चार दिवस धुमसत राहिली. त्यामुळे परिसरात प्रचंड विषारी धुराचे लोट पाहायला मिळाले. यामुळे 27 फेब्रुवारी रोजी एमआयटी एडीटी शैक्षणिक संकुलातील 6-7 विद्यार्थ्यांना श्वास घेण्यास त्रास होऊन गुदमरल्याने त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात भरती करावे लागले. या आगीमुळे व धुरामुळे शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी, स्थायी कर्मचारी व परिसरातील नागरिकांना श्वसनाचा गंभीर त्रास झाला.

नदीपात्रात टाकलेल्या कचऱ्याला लागलेली आग पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) एकमेव बंब आणि एमआयटी एडीटी विद्यापीठातील 25-30 कर्मचाऱ्यांनी पाच दिवस प्रयत्नांची पराकाष्ठा करून मंगळवारी (2 मार्च) विझवली. मात्र लागलेल्या या आगीमुळे चार दिवस परिसरात विषारी धुराचे प्रचंड लोट जमा झाले.

यामुळे वसतिगृहातील तसेच परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होणे, डोळ्यांची जळजळ होणे, घसा बसणे इत्यादी त्रास झाला.

तसेच शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांना विषारी धुरामुळे शुक्रवारी मध्यरात्री अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात भरती करावे लागले होते.

एमआयटी शैक्षणिक संकुलात सध्या राज्यासह देश-विदेशातून आलेले जवळपास 20,000 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी जवळपास 5,000 विद्यार्थी व 1,000 कर्मचारी शैक्षणिक संकुलाच्या परिसरात वास्तव्यास आहेत. त्यामुळे, प्रशासनाने लवकरात-लवकर या गंभीर विषयाची दखल घेत, तातडीने नदीपात्रात कचरा टाकणे थांबवावे अशी, आग्रही मागणी विद्यार्थ्यांनी यावेळी केली.

# जिंकण्यासाठी जिद्द, धैर्य व चिकाटी असावी - एव्हरेस्टवीर आनंद माळी

पिंपरी, पुणे (दि. 4 मार्च 2026) कोणत्याही स्पर्धेत जिंकण्यासाठी आपल्यामध्ये जिद्द, धैर्य व चिकाटी असावी लागते. त्याला योग्य मार्गदर्शकांची साथ मिळाली की यश नक्की मिळते. सांघिक अथवा वैयक्तिक अशा कोणत्याही खेळात सहभाग घेतल्याने मानसिक, भावनिक आणि शारीरिक स्वास्थ्य उत्तम राहते असे मार्गदर्शन ज्येष्ठ क्रीडापटू व एव्हरेस्ट वीर आनंद माळी यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट तर्फे 'युवोत्सव 2026' हा तीन दिवसीय क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या युवोत्सव स्पर्धेत बॉक्स क्रिकेट मुले 20 संघ, मुली 12 संघ, व्हॉलीबॉल 24 संघ, फुटबॉल 36 संघ आणि आयपीएल ऑक्शन यामध्ये 11 संघांनी भाग घेतला होता. त्यात 1000 पेक्षा अधिक विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ आनंद माळी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी एसबीपीआयएम च्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर, समन्वयक प्रा. डॉ. अमरीश



पद्मा, डॉ. ऋषिकेश कुमार, प्रा. पूर्वा साने आदी उपस्थित होते. संस्थेच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्राचे महत्त्व सांगताना म्हटले की खेळामुळे नेतृत्वगुण, संघभावना व शिस्त विकसित होते.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :- मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाने इंदिरा महाविद्यालयावर 1 धावांनी म्हणजे 20 विरुद्ध 19 असा विजय मिळविला. मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयाने इंदिरा महाविद्यालयावर 7 धावांनी म्हणजे 35 विरुद्ध 28 असा विजय संपादन केला.

व्हॉलीबॉल स्पर्धेत पीसीसीओई संघाने एमआयटीएडीटी विद्यापीठावर 2-0 (25-21, 25-22) असा विजय मिळविला.

फुटबॉल स्पर्धेत गरवारे महाविद्यालयाने डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पिंपरी संघावर पेनल्टी शूट आऊटमध्ये 5-4 असा विजय मिळविला. श्री बालाजी युनिव्हर्सिटी संघाला तृतीय क्रमांक मिळाला. विद्यार्थी समन्वयक व आयोजन समिती सदस्य प्रशांत सायस, सिद्धेश जामोडे, वैभव वाघेरे, धीरज सोनार, ऋषिकेश मुक्कावर, गायत्री घुले, हर्षदा बाबर, कुणाल निकम व अजय गिट्टे यांनी संयोजनात सहभाग घेतला. सूत्रसंचालन आर्या सरदेशपांडे, दिया बंसल व श्रावणी कनोरे यांनी केले.

स्पर्धेतील सर्व विजेत्या संघांना प्रशस्तीपत्र, पारितोषिके बक्षीस देण्यात आली. प्रायोजक व पंचांचा देखील सत्कार करण्यात आला. युवोत्सव मध्ये लकी ड्रॉ मधील प्रथम विजेत्या विद्यार्थ्याला अँड्रॉईड टीव्ही आणि दोन खेळाडूंना स्पीकर्स बक्षीस देण्यात आले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 05/03/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 'क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम' या चित्रपटाचा विशेष प्रीमियर

## दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत महोत्सवाचा होणार समारोप

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सहकार्याने आणि पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी व गाथा फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय महोत्सव 2026' मध्ये 5 मार्च 2026 रोजी दुपारी 3 वाजता 'क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम' या चित्रपटाचा विशेष प्रीमियर होणार आहे. त्यानंतर या महोत्सवाचा दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे हा कार्यक्रम होणार असून जास्तीतजास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.**

पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 2026 ची सुरुवात 3 मार्च रोजी झाली असून या महोत्सवाचे पारितोषिक वितरण गुरुवार, 5 मार्च रोजी सायंकाळी 6.30 वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.




या कार्यक्रमास केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तसेच राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची प्रमूख उपस्थिती तसेच खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ.अमोल कोल्हे, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महेश लांडगे, शंकर जगताप, शंकर मांडेकर, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग सदस्य ॲड.गोरक्ष लोखंडे, महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, शहर सुधारणा समिती सभापती संजय नाना काटे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, आयुक्त श्रावण हर्डीकर, शहरातील नगरसदस्य, नगरसदस्या तसेच महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, उप आयुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटीचे दत्ता गुंड, अभिषेक अवचार, डॉ. विश्वास शेंबेकर, प्रा. डॉ. पांडुरंग भोसले, जय भोसले, गाथा फिल्म सोसायटी अध्यक्ष पुजा गुंड, श्रुती शेंबेकर यांची देखील उपस्थिती लाभणार आहे.

आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमापूर्वी दुपारी 3 वाजता 'क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम' या चितपटाचा प्रीमियर ठेवण्यात आला आहे. यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर देखील उपस्थित राहणार आहे. नागरिकांनी देखील या चित्रपटाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे

पिंपरी चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव 2026 च्या पारितोषिक वितरण समारंभात 'साबर बोंड' या आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेल्या चित्रपटाचे दिग्दर्शक रोहन कानवडे यांना 'पीसीआयएफएफ युवा प्रेरणादायी सिने आयकॉन पुरस्कार 2026' मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. याशिवाय या सोहळ्यात बेस्ट फिचर फिल्म, सर्वोत्कृष्ट माहितीपट, सर्वोत्कृष्ट लघुपट, सर्वोत्कृष्ट चित्रपट, 60 सेकंदाचा सर्वोत्कृष्ट लघुपट असे विविध पुरस्कार दिले जाणार आहेत.

# अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवण्यावर भर देण्यात येणार - अभिषेक बारणे

## स्थायी समितीच्या पहिल्या बैठकीत फक्त साडेसात लाख रुपयांच्या खर्चास मान्यता

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकामध्ये 'इन्कम जनरेशन' आणि 'प्रदूषण नियंत्रण' या दोन प्रमुख सूत्रांवर भर देत शहराच्या शाश्वत विकासाचा आराखडा राबविण्यात येणार असल्याची माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी दिली.**

पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या स्थायी समिती बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. बैठकीत मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी सुमारे 7.50 लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली. शहरातील वाढत्या धुळीच्या पार्श्वभूमीवर बांधकाम ठिकाणांची सुरक्षा तपासण्यासाठी दोन विशेष पथके नेमण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच क्षेत्रीय कार्यालयांनी मोठ्या प्रकल्पांची नियमित देखरेख करावी, असे निर्देश देण्यात आले. महापालिकेची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी करसंकलन वाढविणे, होर्डिंग्जद्वारे महसूल वाढविणे आणि अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवण्यावर भर देण्यात येणार आहे. पालिकेवरील कर्ज कमी करून कर्जमुक्तीकडे वाटचाल करण्याचा संकल्पही सभापतींनी व्यक्त केला.



बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968